महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

वार्षिक अहवाल : सन २०२१-२०२२

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१	महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्थापना व कार्य	३-५
२	संचालक मंडळ	६
३	व्यवस्थापन	७-८
४	वित्तीय स्थिती	९-११
५	इतर विभाग	****
	(अ) बाजार समिती विभाग	१२-१४
	(ब) निर्यात विभाग	१५-२४
	(क)प्रकल्प विभाग	२५
	(ड) अभियांत्रिकी विभाग	२६-३०
	(इ) संगणक विभाग	३१-३२
	(ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग	३३-३५
	(प) देशांतर्गत व्यापार विकास विभाग	३६-४१
	(फ) तळेगाव शेती विभाग	४२

१. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे - स्थापना व कार्ये

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. सन २०२१-२०२२ या वर्षामध्ये कृषि पणन मंडळाने ३८ वे वर्ष पूर्ण केले आहे व कृषि पणन मंडळाचा ३८ वर्षाचा कालावधी हा विविध क्षेत्रात यश संपादित करुन देणारा तसेच राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सूसुत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले आहेत. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमरित्या चालविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याचप्रमाणे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये बदल करणे आणि बाजार समित्यांसाठी मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी लागू करणेसाठी प्रयत्न केले आहेत.

उद्दीष्ट्ये व प्रमुख कार्यक्रम

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (ज) अन्वये कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे.

२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे.

३. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे.

४. बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे.

५. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे.

६. कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.

७. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे.

८. कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे.

९. कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे.

१०. या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे.

११. राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे.

अंमलबजावणीतील प्रमुख कार्यक्रम

१. विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बाजार व्यवस्था विकसित करणेकरिता नव-नवीन सुधारणाबाबत सल्ला देणे व त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.

२. फळे भाजीपाला आणि फुले यांचे आयुष्य वाढविण्यासाठी सहकारी संस्थांना प्रशितीकरण करणे Value Addition Centre, शितगृहांची उभारणी करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्धतेबरोबरच उभारणीस मार्गदर्शन करणे.

३. विविध फळे, फुले आणि भाजीपाल्याची रोपे / बियाणे / कंद यांची आयात करणे.

४. बाजार समित्यांची लिलाव प्रक्रीया व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करणे.

५. कृषि पणन मंडळ, पणन संचालनालय व बाजार समित्यांच्या कामकाजासाठी संगणक प्रणाली विकसित करुन कार्यान्वीत करणे.

६. बाजार समित्यांचे पदाधिकारी / अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

७. राज्यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित, कृषी आधारित प्रकल्प वाढविणे तसेच त्यामध्ये उत्पादीत मालाच्या विक्रीसाठी मदत व मार्गदर्शन करणे.

८. विविध प्रदर्शनात भाग घेणे तसेच प्रदर्शनांचे आयोजन करणे.

९. शेतमाल तारण योजना राबविणेसाठी बाजार समित्यांना सवलतीच्या दराने कर्ज देणे.

१०. शेतमाल निर्यातवृध्दी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाचे नमुने परदेशात पाठविणे, निर्यातीबाबतची माहिती शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांना देणे व त्यांच्या मालाची निर्यात करुन देणे.

११. प्रकल्प अहवाल तयार करणे.

१२. तळेगांव ताभाडे येथील शेतीवर आधुनिक शेतीचे प्रयोग राबविणे.

१३. व्ही. एच. टी प्रकल्पातील सोई सुविधांचा व्यावसायिक उपयोग शेतकरी, निर्यातदार यांना करुन देणे.

१४. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा फायदा तसेच अनुदान मिळवून देण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन करणे.

१५. बाजार समित्यांना राज्यातील तसेच परराज्यातील अभ्यास दौऱ्यांसाठी मार्गदर्शन करणे.

१६. "कृषि पणन मित्र" मासिकाचे प्रकाशन आणि वितरण करणे.

१७. 'उत्पादक ते ग्राहक' योजना वेगवेगळ्या शहरांमध्ये राबविणेकरिता संस्थांना प्रोत्साहीत करणे.

१८. प्रसिध्दी माध्यमांशी योग्य समन्वय ठेवून कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांना प्रसिध्दी देवून त्यांची माहिती बाजार समिती, शेतकरी, शेतकऱ्यांच्या संस्था यांच्यापर्यंत पोहोचवून त्याचे फायदे शेतकऱ्यांना करुन देणे.

१९. राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेअंतर्गत माती परिक्षण, शेतकरी प्रशिक्षण तसेच सुगी पश्चात तंत्रज्ञानासंबंधात विविध चाचण्या घेणे.

२०. कृषि पणन मंडळातील अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टिने त्यांना प्रशिक्षित करणे.

२१. कृषि निर्यात क्षेत्र अंतर्गत निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करणे.

२२. हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर मध्ये पूर्ण क्षमतेने प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच नव नविन पिकांबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

२३. उत्पादक ते ग्राहक कृषि माल विक्री योजना कार्यान्वीत करुन तिचा प्रचार आणि प्रसार करणे

२४. कृषि पणनाशी संबंधीत विषयावर माहिती पुस्तिका तयार करणे.

२५. राज्यातील बाजार समित्यांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.

२६. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि विपणनाच्या सुविधा निर्माण करणे.

२७. नक्षलग्रस्त भागातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सोयी सुविधांची उभारणी करणे.

२८. कृषि मालाचे ब्रँण्ड विकसित करणे.

२९. राष्ट्रीय कृषी बाजार (ENAM) प्रकल्पात राज्यातील बाजार समित्यांचा समावेश करणे.

३०. कृषि उत्पन्न बाजार समित्यांसाठी कॉमन अकौंटिंग सिस्टिमचा वापर करणे.

३१. उत्पादक ते ग्राहक उपक्रमाअंतर्गत " शेतकरी आठवडे बाजार " योजनेची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करणे.

३२. शेतकरी उत्पादक कंपन्यांना सल्ला सेवा, मदत, मार्गदर्शन करणे तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतमाल विक्री व्यवस्थेसाठी मार्गदर्शन करणे, त्यांचे मजबूतीकरण करणे.

३३. आंतरराज्य व्यापार वृध्दीसाठी प्रयत्न करणे या अंतर्गत राज्यातील शेतीमाल शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून इतर राज्यात विक्री करणे तसेच इतर राज्यातील शेतीमाल विना मध्यस्त आपल्या राज्यात विक्रीसाठी आणणे.

३४. निर्यातदार आणि शेतकरी / गट / कंपन्या यांचे सांगड घालून निर्यातीला प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे.

३५. निर्यातीस चालना देण्यासाठी " हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग प्रोग्राम " आयोजित करुन निर्यातदार तयार करणे.

३६. निआम - जयपूर, मॅनेज – हैद्राबाद, आय.आय. एफ.टी. – नवी दिल्ली, डी.एम.आय.,वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ को-ऑप मॅनेजमेंट, आय.सी.एम., पुणे यांच्या मदतीने विविध प्रशिक्षण, कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच त्यांचे मार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्या तसेच कृषि पणन मंडळाचे अधिकारी पाठविणे.

२. संचालक मंडळ

अ.क्र.	संचालकाचे नाव	पदनाम
१	**मा. ना.श्री.बाळासाहेब पांडुरंग पाटील** मा. मंत्री, सहकार व पणन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32 तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.	अध्यक्ष
२	**मा. श्री. शंभूराज शिवाजीराव देसाई** मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32 तथा मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.	उपाध्यक्ष
३	**मा.श्री.दिलिपराव मोहिते**, **सभापती,** महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्या., पुणे तथा **मा.सदस्य**, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.	पदसिध्द सदस्य
४	**मा. श्री. अनिल कवडे, भा.प्र.से** सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.	पदसिध्द सदस्य
५	**मा.चिफ जनरल मॅनेजर,** नाबार्ड प्रतिनिधी, **पुणे.**	पदसिध्द सदस्य
६	**मा.श्री.धीरजकुमार, भा.प्र.से** आयुक्त, (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.	पदसिध्द सदस्य
७	**मा.श्री.गजेंद्र सिंग** सहाय्यक उपकृषि पणन सल्लागार, प्रादेशिक कार्यालय, मुंबई.	पदसिध्द सदस्य
८	**मा.श्री.सतिश सोनी (दि.३१/१०/२०२१ पर्यत)** **मा.श्री.सुनिल पवार (दि. १/११/२०२१ पासून)** पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.	पदसिध्द सदस्य
९	**मा.श्री.सुनिल पवार** कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे तथा सदस्य सचिव	सदस्य सचिव

३. व्यवस्थापन

क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	कालावधी	विभाग
१.	श्री. सुनिल गो. पवार (प्रतिनियुक्ती)	--	कार्यकारी संचालक
२.	श्री. दिपक डी. शिंदे (प्रतिनियुक्ती)	--	सरव्यवस्थापक
३.	श्री. दिवाकर डी. देशमुख उपसरव्यवस्थापक(अभियांत्रिकी)	--	अभियांत्रिकी
४.	श्री. मंगेश ई. कदम सहाय्यक सरव्यवस्थापक	--	देशांतर्गत व्यापार विकास
५.	श्री. महेंद्र एल. लोखंडे सहाय्यक सरव्यवस्थापक	--	संगणक
६.	श्री. महेंद्र पी. पवार सहाय्यक सरव्यवस्थापक	--	प्रकल्प/बीडीपी
७.	श्री. अनिमेष पी. पाटील सहाय्यक सरव्यवस्थापक	--	जनसंपर्क व प्रसिध्दी
८.	श्री. दत्तात्रय एस. पाटील व्यवस्थापक	--	प्रशासन
९.	श्री. जयंत एम. कोकणे व्यवस्थापक	--	वित्त व लेखा
१०.	श्री. संदेश पी. बाजारे व्यवस्थापक	--	रा.कृ.वि.यो.- अभियांत्रिकी, मालमत्ता
११.	श्री.अनिल जे. पवार सहाय्यक सरव्यवस्थापक श्री. अरविंद जे. विरकर सहाय्यक सरव्यवस्थापक	दि. १७/०८/२०२१ पर्यत दि. १७/०८/२०२१ पासून	बाजार समिती
१२.	श्री. अरविंद ए. औताडे व्यवस्थापक	--	शेतमाल तारण योजना(बा.स.)
१३.	श्री. कैलास एस. फटांगरे व्यवस्थापक	--	संगणक (हार्डवेअर)
१४.	श्री. विजय व्ही. जगदाळे व्यवस्थापक	--	संगणक (डेटाबेस)
१५.	श्री. सतिश डब्लू. वराडे व्यवस्थापक	-	निर्यात
१६.	श्री. संदिप डी. मेहेरकर व्यवस्थापक	-	शेती (तळेगाव)
१७.	श्री. विनायक जे. राणे विधी अधिकारी श्री. नकुल के. वने विधी सल्लागार	-	विधी

विभागीय उपसरव्यवस्थापक/ विभागीय सहायक सरव्यवस्थापक / विभागीय व्यवस्थापक

क्र.	विभाग प्रमुखाचे नाव व पदनाम	कालावधी	विभाग
१.	श्री. पी.बी. सुर्यवंशी उपसरव्यवस्थापक श्री.आर.आर. महाजन उपसरव्यवस्थापक	दि. ३१/०८/२०२१ पर्यत दि. ०१/०९/२०२१ पासून	पुणे
२.	श्री. सी.एम. बारी उपसरव्यवस्थापक	--	नाशिक
३.	श्री.आर.आर. वीर उपसरव्यवस्थापक	--	लातूर
४.	श्री.एम.एस. गवळे उपसरव्यवस्थापक (अतिरिक्त पदभार)	--	अमरावती
५.	डॉ. बी.एन. पाटील उपसरव्यवस्थापक	--	रत्नागिरी
६.	श्री. एस.एस. घुले उपसरव्यवस्थापक	--	कोल्हापूर
७.	श्री. जी.सी. वाघ उपसरव्यवस्थापक (अतिरिक्त पदभार)	--	औरंगाबाद
८.	श्री. आर.डी. सरोदे उपसरव्यवस्थापक (अतिरिक्त पदभार) श्री.अजय कडू उपसरव्यवस्थापक	दि. १०/०८/२०२१ पर्यत दि. १०/०८/२०२१ पासून	नागपूर

४. वित्तीय स्थिती

उत्पन्नाची साधने

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम क्र. ३९(ल) नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पन्नाची साधने ही कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून जमा होणारे वार्षिक अंशदान, कर्जावरील व्याज, गुंतवणूकीवरील व्याज, निर्यात सुविधा केंद्रे व इतर उत्पन्न ही आहेत.

सदरच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून कृषि पणन मंडळाच्या आस्थापना तसेच प्रशासकीय खर्च व इतर विकासात्मक कामांबाबतचा खर्च भागवून उर्वरीत रक्कम बाजार समित्यांना विकासात्मक कामांसाठी निधी म्हणून देण्याची तरतूद वरील कायदा कलम ३९ (ल) (३) मध्ये नमुद केली आहे. त्यानुसार दिनांक ३१/०३/२०२१ अखेर कृषि पणन मंडळास प्राप्त झालेले उत्पन्न व त्याचा विनियोग याबाबतची माहिती खालीलप्रमाणे;

ताळेबंद - २०२१-२०२२

(रु. कोटीत)

अ.क्र	देयता	रक्कम रु.	संपत्ती	रक्कम रु.
१	मार्केटिंग फंड	४९५.०८	स्थावर मालमत्ता	१९४.९४
२	चालु देयता	९.६९	गुंतवणुक	३१८.२६
३	अनुदान (अपेडा व इतर)	१५३.१५	बँकेतील शिल्लक	३६.६४
४	मार्केटिंग एक्सटेन्शन फंड	७.२३	अखेरच्या मालाचा साठा	०.००
५	कांदा निर्यात डेव्हलपमेंट एक्सटेंशन फंड	४८.४७	बाजार समिती कर्ज येणे	१६.९२
६	आर.के.व्ही.वाय अनुदान	१.११	चालु देयता	१९९.५७
७	तरतुद	५२.५१	आयकर	०.९१
	एकुण	**७६७.२४**	**एकुण**	**७६७.२४**

उत्पन्न व खर्च — २०२१-२०२२

(रु. कोटीत)

अ.क्र.	खर्च	रक्कम रु.	उत्पन्न	रक्कम रु.
१	आस्थापना खर्च	२१.५०	बाजार समिती कर्जावरील व्याज	२.८०
२	प्रशासकीय खर्च	४.६२	गुंतवणुकीवरील व्याज	१९.८०
३	निर्यातवृध्दी	०.३४	प्रकल्प सल्ला विभाग	०.००
४	विकास व प्रकल्प	१.४३	निर्यात सुविधा केंद्रे उत्पन्न	५.५०
५	घसारा	११.६८	कृषि पणन मित्र वर्गणी	०.२४
६	तरतुद	०.००	इतर उत्पन्न	१.७२
७			तुट	९.५०
	एकुण	**३९.५६**	**एकुण**	**३९.५६**

मंडळाचे अतिरिक्त निधी शासकीय व शेड्युल्ड बँकेमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे गुंतवणुकीवरील व्याजाचे उत्पन्न सरासरी ६.४० टक्के दराने मिळाले असून अहवाल वर्षातील भांडवली बाजारातील व्याजदर ४.८० टक्के ते ७.१० टक्के विचारात घेता मिळालेले उत्पन्न निश्चित चांगले आहे.

लेखे तपासणी

पणन मंडळाचे वैधानिक लेखा परिक्षण मार्च २०२०-२०२१ अखेर व अंतर्गत लेखापरिक्षण व कर लेखा परिक्षण मार्च २०२१ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

सन २०२२-२०२३ अर्थसंकल्प - उत्पन्न

(रु.कोटीत)

अ.क्र.	तपशील	रक्कम रु.	टक्केवारी
१	अंशदान	४५.००	४०.८९
२	कर्ज वसुली	२५.००	२२.७१
३	कर्जावरील व्याज (बा.स. व इतर)	७.००	६.३६
४	गुंतवणुकीवरील व्याज	१८.००	१६.३५
५	घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम	६.००	५.४५
६	निर्यात सुविधा केंद्र उत्पन्न	५.००	४.५४
७	अनुदान (आर.के.व्ही.वाय., अपेडा व इतर)	१.००	०.९१
८	इतर उत्पन्न	३.०६	२.७८
	एकुण	**११०.०६**	**१००.००**

सन २०२२-२०२३ अर्थसंकल्प — विनियोग

(रु. कोटीत)

अ.क्र.	तपशील	रुपये	टक्केवारी
१	बाजार समिती कर्ज वाटप व अनदान वाटप	४०.१०	३८.२५
२	आस्थापना, प्रशासकीय व इतर खर्च	३१.२२	२९.७८
३	घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम	३.०३	२.८९
४	भांडवली खर्च (मुख्यालय, निर्यात सुविधा केंद्रे व इतर)	२८.०४	२६.७४
५	निर्यात प्रमोशन व विकास व प्रकल्प	२.४६	२.३५
	एकुण	**१०४.८५**	**१००.००**

सन २०२२-२०२३ अर्थसंकल्प – उत्पन्न



सन २०२२-२०२३ अर्थसंकल्प – विनियोग



५. इतर विभाग

अ) बाजार समिती विभाग

दि. १ एप्रिल २०२१ ते दि. ३१ मार्च २०२२ या अहवाल वर्षात राज्यात एकुण ३०६ बाजार समित्यां व ६१८ उपबाजार कार्यरत आहेत. बाजार समित्या राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत. राज्यातील कार्यरत असणाऱ्या बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे;

अ. क्र.	विभाग	मुख्य बाजार	उपबाजार
१)	रत्नागिरी	२०	४४
२)	नाशिक	५३	१२०
३)	पुणे	२३	६६
४)	औरंगाबाद	३६	७३
५)	लातूर	४८	८२
६)	अमरावती	५५	९९
७)	नागपूर	५०	८०
८)	कोल्हापूर	२१	५४
	एकूण	**३०६**	**६१८**

१) अंशदान :

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ (२) अन्वये अहवाल वर्षात महाराष्ट्रातील एकूण २९९ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पन्नावर अंशदान आकारणी करण्यात आली.

(रु. लाखात)

दि.३१/०३/२०२१ अखेर थकीत रु.	सन २०२०-२१ ची अंशदान मागणी रु.	एकूण वसूलपात्र रक्कम रु.	वसूल रक्कम रु.	येणेबाकी रु.
२६९६.३२	४३१९.००	७०१५.३२	४१२८.३३	२८८६.९९

२) कर्ज :

विकासात्मक कर्ज :

कृषि पणन मंडळामार्फत बाजार समित्यांना त्यांचे मुख्य व दुय्यम बाजार आवारातील विविध विकास कामे करण्यासाठी अंतरिम व दिर्घ मुदतीची कर्जे (अर्थसहाय्य) म्हणून मंजूर केली जातात. यामध्ये प्रामुख्याने अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यावर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे, शेतकरी बाजार तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामांचा समावेश होतो.

अहवाल वर्षात कृषि उत्पन्न बाजार समित्यांना विविध विकासात्मक कामे व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गोदाम व धान्य चाळणी यंत्र उभारणीसाठी तसेच ई-नाम योजनेअंतर्गत धान्य चाळणी यंत्र उभारण्यासाठी एकुण रक्कम रु. १७,०७,८७,८३०/- इतके कर्ज वितरित करण्यात आलेले आहे.

मुदती कर्ज -

अ.क्र.	बाजार समिती संख्या	व्याजदर	अदा रक्कम रु.	कर्जाचे कारण
१	७	६ %	३,७८,३५,२९३	विविध विकासात्मक कामे करण्यासाठी.
२	६७	३ %	११,८२,५८,८१०	राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गोदाम बांधकामासाठी.
३	११	३ %	८६,७५,३७७	राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत धान्य चाळणी यंत्र उभारण्यासाठी. (शेड + यंत्र)
४	१०	३ %	६०,१८,३५०	ई-नाम योजनेअंतर्गत धान्य चाळणी यंत्र उभारण्यासाठी. (शेड + यंत्र)
	एकुण कर्ज अदा रक्कम		**१७,०७,८७,८३०**	

कर्ज व्याजदर -

१) दि. ०९/०३/२०१६ चे परिपत्रकान्वये राज्यातील सर्व बाजार समित्यांसाठी विविध विकसन कामांसाठी देण्यात येणाऱ्या दिर्घ व अल्प मुदती कर्जावर ६ टक्के व्याजदर लागू करण्यात आलेला आहे.

२) राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत समावेश असलेल्या बाजार समित्यांना गोदाम व धान्य चाळणी यंत्र उभारणी तसेच ई-नाम योजनेअंतर्गत समावेश असलेल्या बाजार समित्यांना धान्य चाळणी यंत्र उभारणी करण्यासाठी देण्यात येणाऱ्या मुदती कर्जावर ३% व्याजदर लागू करण्यात आलेला आहे.

३) अर्थसंकल्प मंजुरी -

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३८ आणि त्याखालील नियमातील संबंधित नियमान्वये कृषि पणन मंडळाकडुन कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पुढील वर्षाचे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात येते. त्यानुसार अहवाल वर्षात एकुण २८८ बाजार समित्यांचे सन २०२२-२३ चे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे १३७ बाजार समित्यांचे सन २०२१-२२ चे पुरवणी अर्थसंकल्प मंजुर करण्यात आले आहेत. तसेच सन २०२०-२१ चे ५९ बाजार समित्यांचे पुर्नविनियोजन पत्रके मंजूर करण्यात आली आहेत.

४) थेट पणन अंतर्गत राज्यातील बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील खरेदीवरील बाजार फी बाबत -

महाराष्ट्र शासनाकडील दि.५ जानेवारी २००४ चे आदेशानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन आय.टी.सी.लि., कारगील इंडिया प्रा.लि., मेगासेव प्रा.लि.,रिलायन्स फ्रेश लि., राधाकृष्ण फुडलँड प्रा.लि.,आदित्य बिर्ला क्वाडरँगल ट्रेडिंग सर्व्हिसेस, महा. कंझ्युमर फेडरेशन, महिंद्रा शुभ लाभ या कंपन्यांना उक्त अधिनियमातील कलम ७ मधून सुट देऊन महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या

आवाराबाहेर शेतमालाची थेट खरेदी करण्यासाठी काही अटींस अधीन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वरील कंपन्यांकडून शेतमालाची मोठ्या प्रमाणात खरेदी चालू आहे. थेट पणन अंतर्गत राज्यात एकुण १४६१ कंपन्यांना पणन संचालनालयामार्फत परवाना देण्यात आलेला आहे. थेट पणन परवाना प्राप्त धारकांनी खरेदी केलेल्या शेतमालावरील बाजार फी कृषि पणन मंडळाकडे जमा करणे बंधनकारक आहे.

त्यानुसार ३२ अनुज्ञप्ती धारक कंपन्यानी दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीमालावरील कृषि पणन मंडळाकडे जमा केलेली बाजार फी रक्कम रु. ९७,१७,२३१/- संबंधित १०० बाजार समित्यांचे बँक खात्यावर NEFT व RTGS द्वारे वर्ग करण्यात आली आहे.

ब) निर्यात विभाग

राज्यातील कृषि मालाची निर्यात वाढावी व त्यासाठी निर्यातक्षम उत्पादनात वाढ होणेकरिता विविध कार्यशाळेच्या माध्यमातून शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे त्यासाठी कृषि मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ. साठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे, प्रशितकरण आणि शितगृहांची उभारणी करणे, शेतकरी, बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करून निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशील आहे.

निर्यात वृध्दीकरिता पायाभूत सुविधांची उभारणी

राज्यामध्ये उत्पादीत होणा-या विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यामध्ये हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब व फुले या उत्पादनांकरिता कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब या कृषि निर्यात क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नोडल एजन्सी या नात्याने कृषि पणन मंडळामार्फत विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातीसाठी राज्यात खालीलप्रमाणे पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आलेली आहे.

निर्यात सुविधा केंद्राचा प्रकार व संख्या तपशील

अ.क्र.	सुविधा	संख्या
१.	निर्यात सुविधा केंद्र	२१
२.	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र	२०
३.	फुले निर्यात सुविधा केंद्र	३
एकूण		**४४**

अहवाल कालावधीमध्ये वापर झालेल्या निर्यात सुविधा केंद्रांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

विभागाचे नाव	सुविधा केंद्राचे नांव	ठिकाण	प्रकल्पातील समाविष्ट घटक		प्रक्रिया मे.टन
			घटक	क्षमता	
पुणे	फळे व भाजीपाला सुविधा केंद्र,इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे	शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड इंदापुर, जि.पुणे	कोल्ड स्टोरेज	३ x ४० मे. टन	३०२ केळी
			प्रिकुलिंग	५ मे. टन/बॅच	
			ट्रान्सफॉर्मर	१६० KVA	
			डी.जी. सेट	१०० KVA	
	आईस मेकींग युनीट		आईस स्टोरेज	४० मे. टन	
			आईस टँक	५ मे. टन /दिवस	
	द्राक्षे व डांळिब निर्यात सुविधा केंद्र,बारामती, जि.पुणे	जळोची, ता. बारामती, जि. पुणे,	प्रिकुलिंग	५ मे. टन / बॅच	४३३ आंबा
			कोल्ड स्टोरेज	२ x २५ मे. टन	
			पॅक हाऊस	४०३५ स्क्वे. फुट	
			हाताळणी यंत्रणा	१.५ मे. टन / तास	
			डी.जी. सेट	१२५ KVA	
	फुले निर्यात सुविधा केंद्र, तळेगांव (दा), ता.मावळ, जि.पुणे	महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (फ्लोरीकल्चर पार्क) जोग सेंटर - एमआयडीसी, तळेगाव, जि. पुणे	प्रिकुलिंग	२ x ५ मे.टन / बॅच	१४.७९ लाख गुलाब फुले
			कोल्ड स्टोरेज	४ x २५ मे.टन	
			पॅकहाऊस	६००४ चौ.फुट	
			डि.जी. सेट	२०० KVA	
			ट्रान्सफॉर्मर	२०० KVA	
	निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव, ता. मावळ, जि. पुणे.	हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.	प्रिकुलिंग	५ मे. टन. / बॅच	४६.२ टोमॅटो
			कोल्ड स्टोरेज	५० मे. टन	
			पॅक हाउस	८०० स्क्वे. फुट	
कोल्हापूर	डाळिंब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि. सांगली	कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.	प्रिकुलिंग	५ मे. टन / बॅच	६० डाळींब, द्राक्ष, केळी
			कोल्ड स्टोरेज	२ x २५ मे.टन	
			पॅकहाऊस	२००० स्क्वे. फुट	
			डि.जी. सेट	२०० KVA	
			ट्रान्सफॉर्मर	२०० KVA	
रत्नागिरी	हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे, जि. रत्नागिरी	शांतीनगर, नाचणे रोड, ता. जि. रत्नागिरी	प्रिकुलिंग	५ मे. टन. / बॅच	३६.१५ आंबा, फणस
			कोल्ड स्टोरेज	२५ मे.टन	
			रायपनिंग चेंबर	५ मे.टन	
			पॅकहाऊस	६००० स्क्वे. फुट	
			हाताळणी यंत्रणा	१.५ मे.टन / तास	
			प्लॅस्टिक क्रेट्स	८०० नग	
			डी.जी. सेट	१०० KVA	
			ट्रान्सफॉर्मर	१६० KVA	

विभागाचे नाव	सुविधा केंद्राचे नांव	ठिकाण	प्रकल्पातील समाविष्ट घटक		प्रक्रिया मे.टन
			घटक	क्षमता	
	विकीरण सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई.	सेक्टर १९, दाना बंदर गेट नं. २ समोर, वाशी, नवी मुंबई.	रॅडिएशन सोर्स	कोबाल्ट ६०	२०९७.५२२ आंबा, मसाले पदार्थ ड्रायफ्रुट, पशुखाद्य,
			सोर्स तिव्रता	५०० कि.क्युरी	
			रॅडिएशन युनिट (आंबा)	५ मे. टन / तास	
			कोल्ड स्टोरेज	७६ मे.टन	
			डि.जी.सेट	५०० KVA	
			ट्रान्सरफॉर्मर	५०० KVA	
	भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी, नवी मुंबई.	सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई.	प्रिकुलिंग	५ मे.टन / तास	३३९०.२३१ फळे व भाजीपाला, आंबा
			कोल्ड स्टोरेज	९८ मे.टन	
	व्हेपर हीट ट्रीटमेंट, वाशी, नवी मुंबई (व्ही.एच.टी.)	निर्यात भवन, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती,भाजीपाला बाजार आवार, सेक्टर नं.२१,वाशी, मुंबई.	व्हि.एच.टी. मशिन	१.५ मे.टन / बॅच	३१६५.२०२ आंबा, सिताफळ, संत्रा, फळे व भाजीपाला
			कोल्ड स्टोरेज	२ x ५० मे. टन	
			पॅक हाऊस	४००० स्के.फुट	
			हाताळणी यंत्रणा	१ मे.टन / तास	
			प्लॅस्टिक क्रेट्स	४३२ नग	
			ॲल्युमिनीअम पॅलेट	१२ नग	
			डी.जी. सेट	१२५ KVA	
			ट्रान्सफॉर्मर	५०० KVA	
नाशिक	कांदा, द्राक्ष व डाळिब निर्यात सुविधा केंद्र, कळवण, ता. कळवण, जि. नाशिक	मु.पो.भेंडी, ता. कळवण, जि. नाशिक	प्रिकुलिंग	५ मे. टन. / बॅच	३८०१.५ टोमॅटो, मका,
			कोल्ड स्टोरेज	५० मे. टन	
			पॅक हाऊस	४३५० स्के.मी. X २	
			हाताळणी यंत्रणा	२ मे.टन / तास	
			कांदा साठवणूक	८ x ५० मे.टन	
			वे-ब्रिज	६० मे.टन	
			स्टाफ कॉर्टर	२ x १ BHK	
			प्लॅस्टिक क्रेट्स	१००० नग	
			डी.जी. सेट	१६० KVA	
	कांदा निर्यात सुविधा केंद्र चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक	कृषि उत्पन्न बाजार समिती, चांदवड मौजे. चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक	प्रिकुलिंग	५ मे.टन / बॅच	८४९.१६
			कोल्ड स्टोरेज	५० मे.टन	
			पॅकहाऊस	४७६५ क्स्वे. फुट	
			डि.जी. सेट	१६० KVA	
			ट्रान्सफॉर्मर	१६० KVA	
			कांदा चाळ	३५० मे.टन	
			प्लॅस्टिक क्रेट्स	५०० नग	
	फुले निर्यात	कृषि उत्पन्न बाजार	प्रिकुलिंग	५ मे.टन / बॅच x २	३१०५

विभागाचे नाव	सुविधा केंद्राचे नांव	ठिकाण	प्रकल्पातील समाविष्ट घटक		प्रक्रिया मे.टन
			घटक	क्षमता	
	सुविधा केंद्र, मोहाडी, ता.दिंडोरी, जि.नाशिक	समिती, दिंडोरी, उपबाजार आवार, मोहाडी, गट नं.१२८६ ता. दिंडोरी, जि.नाशिक	कोल्ड स्टोरेज	२०० मे.टन	द्राक्षे
			पॅकहाऊस	६००४ चौ.फुट	
			डि.जी. सेट	२०० KVA	
			ट्रान्स फॉर्मर	२०० KVA	
	केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा, ता.रावेर, जि.जळगाव	कृषि उत्पन्न बाजार समिती, रावेर, ता.रावेर, जि.जळगाव	प्रिकुलिंग	५ मे. टन. / बॅच	७९७.५ केळी, मका
			कोल्ड स्टोरेज	२५ मे. टन.	
			रायपनिंग चेंबर	२५ मे.टन / बॅच	
			पॅकहाऊस	५७०० स्क्वे. फुट	
			हाताळणी यंत्रणा	२ मे.टन / तास	
			प्लॅस्टिक पॅलेट्स	१५० नग	
			वे-ब्रिज	६० मे.टन	
			स्टाफ कॉर्टर	२ x १ BHK	
			डी.जी. सेट	१४० KVA	
			ट्रान्सफॉर्मर	१६० KVA	
औरंगाबाद	केळी निर्यात सुविधा केंद्र, बसमतनगर, जि. हिंगोली	गट नं. १६७, तालुका बीज गुणन केंद्र, ता.वसमत, जि. हिंगोली.	प्रिकुलिंग	५ मे. टन. / बॅच	५००.६ हळद, चना, सोयाबीन
			कोल्ड स्टोरेज	२५ मे. टन.	
			रायपनिंग चेंबर	२५ मे.टन/बॅच	
			पॅकहाऊस	५७०० स्क्वे. फुट	
			हाताळणी यंत्रणा	२ मे.टन / तास	
			प्लॅस्टिक पॅलेट्स	१५० नग	
			वे-ब्रिज	६० मे.टन	
लातूर	केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, बीड	कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, ग्रामपंचायत बहीरवाडी, ता. जि. बीड.	प्रिकुलिंग	५ मे. टन / बॅच	३ मशरुम
			कोल्ड स्टोरेज	५० मे.टन	
			रायपनिंग चेंबर	१० मे.टन	
			पॅक हाऊस	३८७५ स्क्वे. फुट	
			डि.जी. सेट	१६० KVA	
			ट्रान्सफॉर्मर	१६० KVA	
	आंबा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, लातुर	एमआयडीसी, लातूर प्लॉट क्रमांक डी -१ / १ न्यू एमआयडीसी, वेअरहाऊस गोडाऊन, बार्शी रोड जवळ ता. जि. लातूर	प्रिकुलिंग	५ मे. टन. / बॅच	१६२० कोथींबीर, लिंबु, द्राक्ष, मिरची
			कोल्ड स्टोरेज	१०० मे.टन	
			पॅकहाऊस	५७०० स्क्वे. फुट	
			रायपनिंग चेंबर	२५ मे.टन / बॅच	
			हाताळणी यंत्रणा	२ मे.टन / तास	
			वे-ब्रिज	६० मे.टन	
			प्लॅस्टिक क्रेट	१००० नग	
			स्टाफ कॉर्टर	२ x १ BHK	
			डी.जी. सेट	२५० KVA	

विभागाचे नाव	सुविधा केंद्राचे नांव	ठिकाण	प्रकल्पातील समाविष्ट घटक		प्रक्रिया मे.टन
			घटक	क्षमता	
अमरावती	संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरुड	डॉ.पंजाबराव देशमुख कृषि शेती माल प्रक्रिया, पणन सहकारी संस्था मर्या., वरुड, ता. वरुड, जि. अमरावती	प्रिकुलिंग	५ मे.टन / बॅच	५२.८१५ संत्रा
			कोल्ड स्टोरेज	२५ मे.टन	
			ग्रेडिंग लाईन	२ मे.टन/ तास	
			डि.जी. सेट	१६० KVA,	
				३० KVA	
			ट्रान्स फॉर्मर	१६० KVA	
			वे-ब्रिज	६० मे.टन	
			स्टाफ कॉर्टर	२ x १ BHK	
नागपूर	संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा घाडगे	कारंजा घाडगे, ता. कारंजा घाडगे, जि.वर्धा	प्रिकुलिंग	५ मे. टन. / बॅच	३१२ संत्रा
			कोल्ड स्टोरेज	२५ मे. टन	
			पॅकहाऊस	३३०० स्क्वे. फुट	
			हाताळणी यंत्रणा	२ मे.टन / तास	
			वॅक्सिंग युनिट		
			प्लॅस्टिक क्रेट	७००० नग	
			वे-ब्रिज	६० मे.टन	

फळे व भाजीपाल्याकरिता आधुनिक सुविधा केंद्र (२०)

विभागाचे नाव	सुविधा केंद्राचे नाव	प्रकल्पातील समाविष्ठ घटक	प्रक्रीया तपशील मे.टन
पुणे	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, शेलपिंपळगाव, ता. खेड,जि.पुणे	• कोल्ड स्टोरेज - २५ मे. टन • प्रिकुलिंग - ५ मे.टन • पॅक हाऊस एरिया - १०७.३० चौ.मी. (११५५ स्क्वे.फुट) • डी.जी.सेट- ६२.५ KVA • ट्रान्सफॉर्मर - १०० KVA • अँन्टीरुम - ४२ चौ.मी. • प्लँटरूम - ३९ चौ.मी. • ऑफिस - ३२ चौ.मी. • स्टोअर रूम - १७.३० चौ.मी. • गाळे - ३ - ५४ चौ.मी. • अंतर्गत रस्ते व संरक्षण भिंत, बाह्य विद्युतीकरण, प्लॅस्टिक क्रेट्स	१३० बटाटा
कोल्हापूर	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, मसूर, ता.कराड,जि. सातारा		२१२ बेबीकॉर्न गुळ, डाळ
	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, म्हसवड, ता. माण, जि.सातारा		१६.४२ मुग, हरभरा
लातूर	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड		२४४० केळी
नागपूर	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर		१६६४.११६ हळद, मिरची, धने पावडर, सोयाबीन
	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, मोहाडी, ता. मोहाडी, जि. भंडारा		२०० हिरवी मिरची,भेंडी
	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा		८८ मिरची

१) भाजीपाला प्रक्रिया केंद्र (VPF), वाशी

युरोपियन युनियनने भारतातून आयात होणाऱ्या आंबा व पाच भाजीपाल्यावर आयात बंदी केली आहे. या पार्श्वभुमीवर कृषि पणन मंडळाने पुढाकार घेउन अपेडा यांच्या सहकार्याने व कृषि उत्पन्न बाजार समिती मुंबई यांच्या जागेवर वाशी येथे कृषि पणन मंडळामार्फत भाजीपाला प्रक्रिया केंद्राची उभारणी करणेत आली आहे. सदरील सुविधेवर आंबा, भेंडी, मिरची, कारले, वांगी व इतर भाजीपाला यावर हॉट वॉटर प्रक्रिया करण्यात येते. तसेच सदरील सुविधेवर प्रिकुलींग व कोल्डस्टोरेजची सुविधा देखील उभारण्यात आली आहे. सदर सुविधा वाशी येथे असल्याने ही सुविधा युरोपियन देशांमध्ये भाजीपाला निर्यात वृध्दीसाठी विशेष महत्वाची ठरली आहे. तसेच या सुविधेवर अमेरिका येथे आंबा निर्यातीकरिता आवश्यक असलेली हॉट वॉटर प्रक्रिया देखील करुन देण्यात येते. सदर सुविधेचा वापर विवीध खाजगी निर्यातदार, शेतकरी कंपनी, सहकारी संस्था यांच्यामार्फत केला जातो.

२) विकीरण सुविधा केंद्र वाशी, नवी मुंबई

तब्बल १८ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर सन २००६ मध्ये अमेरीकन बाजारपेठ भारतीय आंब्यासाठी खुली झाली होती. परंतु त्यासाठी प्राथमिक अट ही आंबा विकिरण प्रक्रिया करुन पाठवणे अशी होती. त्यासाठी पणन मंडळामार्फत बी.ए.आर.सी.च्या मालकीची कृषक विकिरण सुविधा वाहतुकीच्या दृष्टीने सोईस्कर नव्हती. त्यामुळे निर्यातदारांच्या मागणीनुसार व अपेडाच्या मार्गदर्शनाने कृषि पणन मंडळामार्फत मोठ्या क्षमतेच्या विकिरण सुविधेची उभारणी वाशी, नवि मुंबई येथे अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वत:चा अतिरिक्त निधी वापरुन सुविधा उभारणेचे कामकाज पूर्ण झाले असुन AERB, DAE, NPPO, USDA-APHIS, FSSAI चे प्रमाणीकरण पुर्ण झाले आहे. सदर सुविधेवरुन आंबा, डाळिंब, मसाल्याचे पदार्थ, पशुखाद्य, सुकामेवा, कांदा, आटा, मैदा, कडधान्य, औषधीकरीता डिंक इ. पदार्थावर निर्यातीकरीता प्रक्रिया करण्यात आली आहे.

३) व्ही. एच. टी. सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई

आंबा फळमाशी विरहित करण्यासाठी ही प्रक्रिया पध्दत अवलंबविली जाते. जपान, युरोपीयन देश, न्युझिलंड, मॉरिशस, साऊथ कोरिया इत्यादी देशांकडून आंबा आयाती पूर्वी सदर प्रक्रियाची मागणी केली जाते. पणन मंडळाने याकरिता १.५ मे. टन क्षमतेची व्ही. एच. टी. सुविधा वाशी, नवी मुंबई येथे उभी केली असून या द्वारे उपरोक्त देशांना प्रतिवर्षी सुमारे २५० मे. टन आंब्याची निर्यात करण्यात येते. तसेच सदर सुविधेवरील इतर घटकांचा वापर करुन फळे व भाजीपाल्याची सर्व प्रमुख देशांना निर्यातदारांमार्फत निर्यात केली जाते.

निर्यात विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना:

अ) कृषि मालाच्या निर्यातीकरिता नव्याने खुल्या झालेल्या देशांकरिता समुद्रमार्गे वाहतुकीसाठी रु. ५०,०००/- प्रति कंटेनर अनुदान देणेबाबत योजना.

महाराष्ट्र राज्यातून कृषि मालाच्या निर्यातीस जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळावे यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत सहकारी संस्था, शेतकरी, कंपनी, निर्यातदार, शेतकरी उत्पादक गट यांनी फळे व भाजीपाला (द्राक्षे वगळून) या कृषि मालाच्या समुद्रमार्गे केलेल्या थेट निर्यातीस आर्थिक सहाय्य देण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा प्रस्ताव विचारार्थ होता. याबाबत पणन मंडळाच्या मा. संचालक मंडळ सभा क्र.

१३४ दि. २.०७.२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी रुपये १ कोटी इतकी रक्कम राखून ठेवावी असे ठरलेले आहे.

पणन मंडळाने कंटेनर भाड्यात सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी यांना अनुदान देण्याची सवलत दिल्यामुळे अशा संस्थांचा निर्यातीमध्ये सहभाग वाढेल अशी आशा असून सदर योजना खालील तक्यात नमुद केलेल्या देशात व विहित केलेल्या कृषिमालाची समुद्रमार्गे निर्यात करतील अशा सहकारी संस्था / शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी,कंपनी, निर्यातदार, शेतकरी उत्पादक गट यांना रु. ५०,००० /- प्रति कंटेनर (२० फुटी / ४० फुटी) अनुदान देणेत येईल. अनुदानाची महत्तम मर्यादा प्रति लाभार्थी रु. १.०० लाख प्रति वर्ष एवढी राहील. योजनेसाठी २०२१-२२ या वर्षात आर्थिक तरतूद एकूण रु. १ कोटी करण्यात आलेली आहे.

निर्यातीकरिता देश व उत्पादने

अ.क्र.	देश	उत्पादने
१	अमेरिका	आंबा , डाळींब
२	ऑस्ट्रेलिया	आंबा
३	साऊथ कोरीया	केळी ,आंबा
४	कजाकिस्तान (via Bandar Abbas Port)	आंबा
५	अफगाणिस्तान (via Bandar Abbas Port)	केळी व कांदा
६	इराण	केळी, संत्रा,आंबा
७	रशिया	केळी , आंबा
८	मॉरिशस	कांदा, आंबा
९	लॅटव्हीया (Via Rega Port)	भाजीपाला व कांदा
१०	युरोपियन समुदाय	आंबा,डाळिंब,
११	कॅनडा	आंबा,डाळिंब,
१२	सर्व देश	संत्रा

योजनेच्या अटी व शर्ती:-

- सहकारी संस्था ,शेतक-यांची उत्पादक कंपनी, शेतकरी,निर्यातदार, कंपनी,शेतकरी गट, फर्म यांनी समुद्रमार्गे कंटेनरद्वारे थेट निर्यात (Direct Export) करणे बंधनकारक राहील.
- या योजनेचा लाभ फक्त महाराष्ट्रातील सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी, निर्यातदार, कंपनी, शेतकरी गट, फर्म यांना देय राहील.
- लाभार्थींनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्जासोबत संबंधित कागदपत्रे तसेच ज्या पुरवठादार कंपनीकडून कंटेनर उपलब्ध केलेला आहे त्याचे देयक सादर करणे बंधनकारक राहील.
- सदर योजना ही निश्चित केलेले देश व शेतमालाच्या उत्पादनासाठीच लागू राहील.
- व्यापा-यांनी सहकारी संस्थांच्या मध्यमातून निर्यात केल्यास अनुदान देय होणार नाही.
- निर्यातदार संस्था निर्यात केलेल्या मालाची विक्री रक्कम प्राप्त झाल्यानंतरच योजनेकरिता अर्ज करु शकतील, जेणेकरुन गुणवत्तेअभावी मालाची विक्री रक्कम प्राप्त न झाल्यास अशा प्रस्तावांना अनुदान देय होणार नाही.
- कृषि मालाचा नमुना पाठविण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

- अनुदान संपूर्णपणे नामंजूर, अंशत: मंजुरी अथवा पूर्णपणे मंजूर करण्याचे सर्व अधिकार मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारास बंधनकारक राहील
- सदर योजना ही २०२१-२२ या कालावधीत समुद्रमार्गे निर्यात केलेल्या कृषिमाल व देश यासाठी लागू राहील.

ब) राज्यातील भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त कृषि उत्पादनांच्या नोंदणी, प्रचार, प्रसिद्धी व मुल्यसाखळी विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य योजना.

एखाद्या भौगोलिक प्रदेशातील वैशिष्ठ्यांमुळे, हवामान, संस्कृतीमुळे, एखाद्या उत्पादनात, त्याच्या उत्पादन प्रक्रियेत अनेक वर्ष दर्जा, चव, रंग, वास उतरत असतील, ते वर्षानुवर्ष कायम राहत असतील, तर अशा उत्पादनांची नोंदणी भौगोलिक निर्देशन नोंदणी कार्यालय येथे करता येते. यामुळे अशा उत्पादनांना दहा वर्षे इतर प्रदेशातल्या अनधिकृत उत्पादनांपासून भेसळ होणे, रास्त किंमतीपेक्षा कमी किंमत मिळणे यासारख्या गोष्टींपासून संरक्षण मिळते व परत संरक्षण कालावधी वाढवता येतो. यामुळे या प्रदेशातील स्थानिक उत्पादकांना अधिकाधिक आर्थिक लाभ मिळण्याची संधी उपलब्ध होत असते. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादनांच्या अधिक उत्पादनांसाठी तसेच या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये २४ कृषि उत्पादनांना भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त झाले आहे.

राज्यामध्ये कृषि उत्पादनाकरिता भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात कामकाज झाले असले तरी भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादनांचे प्रचार, प्रसिध्दी, उत्पादकांची नोंदणी व बाजारसाखळी विकसित करणे यासाठी खालीलप्रमाणे ४ स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

लाभार्थी - शेतकरी, भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणा-या संस्था.

(अ) भौगोलीक मानांकन प्राप्त कृषि उत्पादनांचे प्रचार व प्रसिध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनासाठी अनुदान योजना.

- एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजनासाठी कमाल मर्यादा रु. १०,००० प्रति प्रशिक्षण अर्थसहाय्य (किमान १०० शेतक-यासाठी)

(ब) भौगोलीक मानांकन नोंदणीसाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्याकरिता नोंदणी शुल्कासाठी अनुदान योजना.

- नोंदणी शुल्कापोटी प्रती लाभार्थी कमाल रु. २०० मर्यादेपर्यंत अनुदान.

(क) भौगोलिक मानांकन नोंदणी प्राप्त उत्पादनांचे मुल्यसाखळी विकसीत करण्यासाठी प्रोत्साहन अनुदान योजना.

- उत्पादनांच्या बाजार विकासाकरिता (सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडिंग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) येणाऱ्या खर्चाच्या ५०% जास्तीत जास्त ३,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य.

(ड) कृषि पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव उपक्रमामधील भौगोलिक मानांकन उत्पादनांच्या स्टॉलकरिता अर्थसहाय्य योजना.

- प्रति स्टॉल रु. ३०००/- अर्थसहाय्य.

उपरोक्त चारही योजनांचे प्रस्ताव संबंधित संस्था/शेतकरी यांनी कार्यक्षेत्र लक्षात घेवुन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावे लागतात.

क) राज्यातील प्रगतशील व इच्छूक शेतकरी, उद्योजक यांचेसाठी हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्सचे आयोजन.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत निर्यातपूरक उपक्रमांमध्ये वाढ करावी हा विचार करून "हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्स" आयोजनास माहे डिसेंबर २०१५ पासुन सुरूवात करण्यात आलेली आहे. हा कोर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून तो प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजीत केला जातो. त्याचा कालावधी ५ दिवस आहे. संबंधित ट्रेनिंग चे प्रशिक्षण शुल्क निवास व्यवस्थेसह रू. ११,५०५/-, निवास व्यवस्थेशिवाय रू. ९,७३५/- व महिलांसाठी रू. ८,६३८/- (२५ टक्के सवलत) एवढ्या शुल्काची आकारणी करण्यात येत आहे.

प्रशिक्षणामध्ये पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात येते.

- ताजी फळे व भाजीपाला निर्यात संधी व पणन मंडळाचे कार्य
- निर्यात प्रक्रिया, परवाने, नोंदणी व वीमा
- इनव्हॉईस, पॅकींग लिस्ट, इ. कागदपत्रांची तोंडओळख
- उत्पादनांचा अभ्यास, एच. एस. कोड, आंतरराष्ट्रीय परिस्थिती
- क्वालीटी पॅरॅमिटर्स, फायटो सॅनिटरी, ॲगमार्क स्टॅंडर्स, ट्रेसनेट, MRL/PHI
- पॅकींग, पॅकेजींग, एअर व सी शिपींग, CHA यांच्या जबाबदाऱ्या
- कृषिमालाची वाहतूक व पुरवठा यंत्रणा (स्थानिक, आंतरदेशीय)
- टर्मिनॉलॉजीज, UCPDC, बॅंकींग प्रक्रिया, पेमेंट रिस्क
- निर्यातदारांसाठी RKVY, APEDA, MEIS, शासनाच्या योजना
- निर्यातीसाठी प्रमाणपत्रे (GAP, Human Consumption etc.)
- सुविधा केंद्र गरज (IFC,VHT,HWIT,VPF,PC,CS,RC)
- फळ भाजीपाल्यावर विशेष प्रक्रिया पद्धती
- करार शेती व पणन कायद्यातील बदलामुळे पणन संधी

महाराष्ट्र राज्याचे कृषि निर्यात धोरण तयार करणेबाबत कामकाज:

भारत देश अन्नधान्य, दुध, साखर, फळे आणि भाज्या, मसाले पदार्थ इ. उत्पादनांमध्ये जगात अग्रगण्य उत्पादक देश आहे. केंद्र सरकारने सन २०२२ पर्यंत शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे धोरण जाहीर केले आहे. या उद्दीष्टपूर्ती करतांना कृषिमालाची निर्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावणार आहे.

महाराष्ट्र राज्य हे कृषि निर्यातीच्या दृष्टीकोनातून देशातील महत्वाचे राज्य असून निर्यातीमध्ये राज्यात उत्पादित होणाऱ्या कृषी मालाचा वाटा मोठा आहे. देशातील इतर राज्यांमध्येही कृषि निर्यातीच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात कामकाज होत आहे. तथापि महाराष्ट्रातून होणारी निर्यात वाढत रहावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या कृषि निर्यात धोरणामध्ये राज्य शासनाचा सक्रिय सहभाग असावा असे नमुद केले आहे. राज्यामध्ये कृषि निर्यात धोरण राबविणेकरिता केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणुन नियुक्ती केली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने राज्याचे स्वतंत्र कृषि निर्यात धोरण तयार करुन शासनास सादर केलेले आहे. सदर कृषि निर्यात धोरणा अंतर्गत क्लस्टरनिहाय प्रशिक्षण कार्यक्रम, निर्यातवृद्धी होणेकरिता विवीध स्तरावरील अडी-अडचणी दुर करणेकामी शेतकरी, उत्पादकांच्या सहकारी संस्था, उत्पादकांचे संघ, शेतकरी उत्पादक कंपन्या, निर्यातदार आणि शासकीय यंत्रणेसह संबंधितांच्या बैठकांचे आयोजन, बायर सेलर मीटचे आयोजन करण्यात येत आहे.

प्रकल्प विभाग

१) सल्ला सेवा

पणन मंडळाकडून राज्यातील बाजार समित्यांना व सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षात प्रकल्प सल्ला पुरविण्यात आला. या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेवून सर्व सोयींनीयुक्त अशा प्रकल्प सल्ला विभागाची २३ जुलै २००३ रोजी स्थापना झाली.

या विभागामार्फत पणन मंडळामार्फत उभारण्यात येणा-या सुविधांचे प्रकल्प अहवाल अनुदानाकरिता तयार करुन रा.कृ.वि.योजना व अपेडा यांना सादर करण्यात येतात. केंद्र शासनाच्या एकात्मिक कृषि पणन योजनेच्या कृषि पणन सुविधा या उपयोजने अंतर्गत पणन मंडळाकडे प्राप्त बाजार समित्यांचे प्रस्ताव योजनेच्या निकषाप्रमाणे तपासण्यात येतात.

आजपर्यंत प्रकल्प सल्ला विभाग सद्यस्थितीत कृषि प्रक्रिया प्रकल्पांना सल्ला सेवा पुरवित आहे. अशा सर्व प्रकल्पाची एकूण अदांजित किंमत सुमारे रु. २५० कोटी आहे.

२) Directorate of Marketing & Inspection, Mumbai यांना AMI sub scheme ISAM योजनेअंतर्गत २५ टक्के अनुदानासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर;

केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत पणन मंडळाकडे प्राप्त खालील बाजार समित्यांचे प्रस्ताव योजनेच्या निकषाप्रमाणे तपासुन २५ टक्के अनुदाना मंजुरीकरीता पुढील कार्यवाहीसाठी कृषि विपणन सल्लागार, विपणन व निरिक्षण संचानालनालय, मुंबई यांना पाठविणेत आले;

अ.क्र.	बाजार समितीचे नाव	प्रकल्प	प्रकल्प किंमत (रु. लाख)
१	कन्नड	मुख्य बाजार कन्नड येथे विविध विकास कामे करणे	४२९.०४
२	उदगीर	उपबाजार सोमनापूर येथे विविध विकास कामे करणे	५९५.७७
३	मंगरुळपीर	मुख्य बाजार व उप बाजार शेलू व चिखली येथे विविध विकास कामे करणे	६२७.८३
४	नांदगाव	उपबाजार बोलठाण येथे विविध विकास कामे करणे	२१९.८७
५	नामपूर	मुख्य बाजार नामपूर येथे विविध विकास कामे करणे	१२४५.५३
६	सटाणा	मुख्य बाजार सटाणा येथे विविध विकास कामे करणे	७७९.५१

ड) अभियांत्रिकी विभाग

कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारातील विविध विकास कामे / बांधकामे जसे - कार्यालय, गोदाम, लिलाव ओटे, लिलाव गृह, रस्ते, स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा, जल नि:सारण व्यवस्था व्यवस्था, व्यापारी गाळे, शेतकरी निवास, गुरांचे शेड, सीमाभिंत, तारेचे कुंपण, हमाल भवन, शितगृहे तसेच केंद्र शासनाच्या बाजार आवार विकास बळकटीकरण योजनेअंतर्गत बाजार आवारातील विविध विकासकामे इत्यादींच्या उभारणीसाठी पणन मंडळाकडे येणा-या कर्ज मागणी प्रस्तावांची, त्या अनुषंगाने येणाऱ्या कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननीचे काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. तसेच कृषि पणन मंडळामार्फत पणन मंडळाच्या स्वनिधी अथवा शासकीय अनुदानातुन उभारण्यात आलेली / येत असलेली शेतीमाल हाताळणी व प्रक्रिया प्रकल्पांची स्थापत्य विषयक व अनुषंगिक तांत्रिक कामकाज अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.

अहवाल वर्षामध्ये (२०२१-२२) अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामकाजाबाबतची माहिती पुढील प्रमाणे :

अ) अभियांत्रिकी विभागामार्फत खालील १८ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्ताव त्रुटी पुर्तता प्रस्ताव / कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननी करण्यात आलेली आहे.

अ.क्र	बाजार समिती नाव व जिल्हा	अ.क्र	बाजार समिती नाव व जिल्हा
	कर्ज मागणी प्रस्ताव		
१	इंदापुर, जि.पुणे,	५	पाटण, जि. सातारा
२	महाड, जि. रायगड,	६	मंगळुरपिर, जि. वाशिम
३	गेवराई,जि.बीड	७	पारनेर, जि. अहमदनगर,
४	दुधनी, जि. सोलापुर		
	कर्ज विनियोग दाखला		
१	इंदापुर, जि.पुणे,	७	पाटण जि. सातारा
२	महाड जि. रायगड	८	मंगळुरपीर जि. वाशिम
३	लाखणी जि. भंडारा	९	चांदवड जि. नाशिक
४	बाभुळगांव जि यवतमाळ	१०	पारनेर जि. अहमदनगर
५	नांदगांव जि. नाशिक	११	बारामती जि. पुणे
६	दुधनी जि. सोलापुर		

ब) निर्यात सुविधा केंद्राची उभारणी

क्र.	प्रकल्पाचे नांव	प्रकल्प किंमत (रु. लाख)	प्रकल्पाची सद्यस्थिती
१	आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, जामगे, ता.खेड, जि. रत्नागिरी	८९२.२८	काम पुर्ण

क) महाराष्ट्र शासनामार्फत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित “महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाअंतर्गत कृषि पणन मंडळाच्या अस्तित्वातील १६ सुविधा केंद्रांचे विस्तारिकरण / आधुनिकीकरण ३ नविन सुविधा १) बारामती, २) पाचोड ता.पैठण ३) बीड) व रा.सु.प.तं.संस्था, तळेगांव संस्थेचे बळकटीकरण करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पांची सद्यास्थिती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

प्रगती पथावर असलेली बांधकामे :

अ.क्र	सुविधा केंद्राचे नाव	प्रकल्प किंमत (रु. कोटी)
अ)	**अस्तित्वातील सुविधा केंद्रांचे विस्तारिकरण / आधुनिकीकरण (एकूण ६ सुविधा) :**	
१	निर्यात सुविधा केंद्र, जालना, जि. जालना.	१.०७
२	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, करमाड, जि. औरंगाबाद	१.१८
३	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, अर्धापूर, जि. नांदेड	०.५२
४	सुविधा केंद्र, लातुर, जि. लातुर	२.९५
५	फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, चांदुर रेल्वे, जि. अमरावती	२.६०
६	संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा.), जि.वर्धा	५.७३
	अपेडा ॲक्रिडिटेशन : सुविधा केंद्र, वरुड, जि. अमरावती	०.५५
	अपेडा ॲक्रिडिटेशन : सुविधा केंद्र, बीड, जि.बीड	०.४२
ब)	**नियोजित प्रकल्प (एकूण ३ सुविधा) :**	
१	फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे	४२.८३
२	फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, पाचोड, ता. पैठण, जि. औरंगाबाद	१५.०७
३	सिताफळ हाताळणी सुविधा केंद्र, बीड, जि. बीड	५.७०

निविदा प्रक्रिया प्रगतीत असलेले प्रकल्प :

अ.क्र	सुविधा केंद्राचे नाव	प्रकल्प किंमत (रु. कोटी)
अ)	**अस्तित्वातील सुविधा केंद्रांचे विस्तारिकरण / आधुनिकीकरण (एकूण १० सुविधा):**	
१	निर्यात सुविधा केंद्र, मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक	४.७३
२	निर्यात सुविधा केंद्र, चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक	२.०१
३	निर्यात सुविधा केंद्र, कळवण, ता. कळवण, जि. नाशिक	४.६१
४	निर्यात सुविधा केंद्र, सावदा, ता. रावेर, जि. जळगांव	६.९४
५	व्हेपर हिट ट्रिटमेंट सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई	१.५६
६	भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई	०.९३
७	विकिरण सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई	०.८६
८	द्राक्ष व डाळींब निर्यात सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे	३.६२
९	डाळींब निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि. सांगली	२.४८
१०	निर्यात सुविधा केंद्र, रा. सु. प. तं. संस्था, तळेगांव दा. , जि. पुणे	३.७५
ब)	**नियोजित प्रकल्प (१ सुविधा) :**	
१.	रा.सु.प.तं.संस्था, तळेगांव दा, जि. पुणे संस्थेचे बळकटीकरणांतर्गत विविध विकास कामे करणे.	१२.८३

राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत व ई-नाम योजने अंतर्गत मंजुर प्रकल्पांची अंमलबजावणी :

१) राज्यातील ८६ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करणे –

धान्य साफसफाईसाठी व प्रतवारीसाठी धान्य चाळणी प्रतवारी यंत्र (Grain Cleaning and Grading Machine) सुविधा बाजार समितीच्या आवारामध्ये उभारणी केल्यास शेतकऱ्यांच्या शेतीमालास चांगला दर मिळू शकेल. याबाबीचा विचार करुन राज्यातील प्रामुख्याने धान्याची आवक असणाऱ्या बाजार समित्यांमध्ये नवीन धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी कृषि पणन मंडळामार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजनेकडे तसेच ई- नाम योजनेकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत राज्यातील ३१ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेच्या नवीन धान्य चाळणी यंत्राची सुविधा उभारणी करण्यासाठी दि. १५/१२/२०१७ रोजीच्या २४ व्या SLSC बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि.०४/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणुन नियुक्त करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.

२४/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये भारत सरकारच्या ई-नाम योजनेअंतर्गत राज्यातील ५५ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेचे एक धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. या दोन्ही प्रकल्पांचा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

धान्य चाळणी प्रतवारी यंत्र प्रकल्प (क्षमता प्रत्येकी २ मे.टन प्रती तास)	एकुण अंदाजित खर्च	अनुदान	पणन मंडळ गुंतवणुक	बा.स.स्वनिधी गुंतवणुक/ पणन मंडळाचे कर्ज
रा.कृ.वि.यो. : ३१ बा.स.	२१.६९	५.०५	३.५०	१३.१४
ई-नाम : ५५ बा.स.	३८.४८	१९.१६	--	१९.३२
एकुण	**६०.१७**	**२४.२१**	**३.५०**	**३२.४६**

या प्रकल्पासाठी एकूण खर्च रु. ६०.१७ कोटी येणार असून राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत व ई-नाम योजने अंतर्गत एकूण अनुदान रु. २४.२१ कोटी मंजूर करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये पणन मंडळामार्फत रु. ३.५० कोटीची गुंतवणूक केली जाणार आहे व उर्वरीत रक्कम रु. ३२.४६ कोटी बाजार समित्यांनी त्यांचे स्वनिधीमधून गुंतवणुक करावयाची आहे. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना पणन मंडळाच्या मा. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार स्वनिधीची रक्कम गुंतवणूक करण्यासाठी आवश्यकतेनुसार पणन मंडळामार्फत ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाची अंमलबजावणी पणन मंडळामार्फत करण्यात आलेली आहे. पहिल्या टप्प्यात बाजार समित्यांचे मागणीनुसार व आवश्यकतेनुसार रा. कृ. वि. यो. अंतर्गत ३१ बाजार समित्यांमध्ये तर ई-नाम अंतर्गत २७ बाजार समित्यांमध्ये अशा एकूण ५८ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी यंत्र प्रकल्पाचे काम प्रस्तावित होते. अहवाल वर्ष अखेरीस ५८ पैकी एकूण ४१ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी शेड बांधकाम व मशीनरी उभारणीचे काम पुर्ण झाले असून उर्वरित ठिकाणी काम प्रगतीपथावर आहे. ज्या ठिकाणी धान्य चाळणी यंत्र प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे, अशा ठिकाणी सदर प्रकल्प वापरासाठी संबंधित बाजार समितीकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत खरेदीसाठी तसेच खुल्या बाजारामध्ये शेतीमाल विक्रीसाठी शेतक-यांना फायदा होणार आहे.

२) राज्यातील १०८ बाजार समित्यांमध्ये एकूण १०८ गोदामांची उभारणी करणे –

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी (Pledge Loan) व शासकीय हमीभाव खरेदी केंद्रा अंतर्गत शेतमाल साठवणुकीसाठी बाजार समित्यांचे आवारामध्ये गोदामांची उभारणी करण्यासाठी दि. २५/०७/२०१८ रोजीच्या रा कृ वि यो च्या २५ व्या SLSC बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत राज्यातील एकूण १०८ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी १००० मेट्रिक टनाचे एक या प्रमाणे नवीन १०८ गोदामांची उभारणी करण्यात येत आहे. त्यासाठी एकूण खर्च रु. ११६.४६ कोटी येणार असून त्यापैकी राष्ट्रीय कृषि विकास योजने कडून ३६ % अनुदान रु. ४१.८६ कोटी मंजूर करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये पणन मंडळामार्फत रु. २३.१९ कोटीची गुंतवणूक केली जात आहे व उर्वरीत रक्कम रु. ५१.४१ कोटी बाजार समितीने स्वनिधीमधून गुंतवणुक करावयाची आहे. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना पणन मंड्ळाच्या मा. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आवश्यकतेनुसार स्वनिधीची

रक्कम रु. ५१.४१ कोटी ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज म्हणुन पणन मंडळामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणी चा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

गोदाम प्रकल्प	**एकुण अंदाजीत खर्च**	**रा.कृ.वि.यो. अनुदान**	**एकुण अंदाजीत खर्च**	**रा.कृ.वि.यो. अनुदान**
	१००%	३६%	२०%	४४%
रा.कृ.वि.यो. अंतर्गत राज्यातील १०८ बा.स. मध्ये प्रत्येकी १००० मे. टन. क्षमतेची एकुण १०८ गोदामे उभारणी करणे.	११६.४६	४१.८६	२३.१९	५१.४१

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि. १२/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी पणन मंडळामार्फत करण्यात आलेली असून अहवाल वर्ष अखेरीस १०८ गोदामांपैकी बहुतांश ठिकाणी गोदामांची कामे पूर्ण झाली आहेत. ज्या ठिकाणी गोदाम बांधकामे पूर्ण झाली आहेत, अशा ठिकाणी सदर गोदामे वापरासाठी संबंधित बाजार समितीकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत. या योजनेमुळे राज्यामध्ये शेती मालासाठी १,०८,००० मेट्रिक टन अतिरिक्त साठवणूक क्षमता निर्माण झाली आहे.

इ) संगणक विभाग

१) मार्कनेट प्रकल्प:

मार्कनेट म्हणजे मार्केट नेटवर्क. या अंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देणे, तसेच बाजार समितीच्या कामकाजामध्ये सुसुत्रता व पारदर्शकता आणणे हा आहे. केंद्र शासनाच्या ॲगमार्केनेट योजने अंतर्गत राज्यातील ३०६ मुख्य बाजार व ६५ उपबाजार यांना संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिती वेबसाईटद्वारे एकत्रित करुन सर्वांना उपलब्ध करण्यात येते. राज्यातील सर्व बाजार समित्यांना कृषि पणन मंडळाची ई-मेल सुविधा पणन मंडळामार्फत विनामुल्य पुरविण्यात आली आहे. कृषि पणन मंडळ व बाजार समित्या यामधील पत्र व्यवहार व माहीती देवाण घेवाण या ई-मेल सुविधेद्वारे सुरू आहे. यामुळे माहीती देवाण घेवाणसाठी लागणा-या वेळेत व खर्चात बचत झाली आहे.

२) राष्ट्रीय कृषि बाजार (eNAM) योजना:

शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण विभागा मार्फत राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम) कार्यान्वित केले आहे. ई-नामचे कामकाज ई-ट्रेडींग प्लॅटफॉर्म द्वारे सुरु आहे. केंद्र शासनाकडून बाजार समित्यांना सॉफ्टवेअर, प्रशिक्षण व सेवा विनामूल्य देण्यात येत असून संगणक व ग्रेडींग सामुग्री खरेदीसाठी प्रति बाजार समिती रु.३०/- लाख अनुदान देण्यात येते. राज्यातील ११८ बाजार समित्या ई-नामला तीन टप्यात जोडण्यात आल्या आहेत. या बाजार समित्यांमध्ये ऑनलाईन गेट एन्ट्री, असेईंग, ई-ऑक्शन व ई-पेमेंट बाबतचे काम सुरु झाले आहे. देशातील १००० बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत.

ई-नाम योजनेतील ११८ बाजार समित्यांची राज्यातील सद्यस्थीती -
सप्टेंबर २०१७ ते ३१ मार्च २०२२ पर्यंत

- ११८ बाजार समित्यांमध्ये ई-ऑक्शन सुरु. एकूण लाख क्विं. ३३२, किंमत - रु. ७९८३/- कोटी.
- शेतमालाची गुणवत्ता तपासणीसाठी ११७ बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित. १ बाजार समित्यांमध्ये मॉईश्चर मिटरचा पुरवठा व लॅब उभारणी बाबत कार्यवाही सुरु.
- १०५ बाजार समित्यांमध्ये असेईंग सुरु, एकूण ९.४७ लाख लॉटस् चे असेईंग.
- ७६ बाजार समित्यांमध्ये ई-पेमेंट सुरु एकूण रक्कम रु. २२५.५७/- कोटी.
- शेतकरी नोंदणी – १२.१४ लाख
- खरेदीदार (व्यापारी) नोंदणी - २०,९८९
- आडते नोंदणी – १७,००१
- एफ.पी.ओ नोंदणी - २६४
- एफ.पी.ओ. ट्रेड - १२ एफ.पी.ओ., ७४४२ क्विं., किंमत - रु. ३.३६/- कोटी
- प्रती लॉट बोली लावण्याचे सरासरी प्रमाण – ५.५२

६० बाजार समित्यांनी आयोजित केलेल्या ग्राम सभा (देशामध्ये राज्याचा प्रथम क्रमांक)

- एकूण ग्राम सभा - १८२८
- सहभागी शेतकरी – ९६,६०९

३) डी.एम.आय. भारत सरकार यांचे कडून संगणक चालकास प्रोत्साहन भत्ता :

डी.एम.आय. भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research & Information Network Scheme अंतर्गत अँगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणा-या बाजार समितीच्या कर्मचाऱ्यास रु.१०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डि.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहन भत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. आत्तापर्यंत रु.८६.२६/- लाख प्रोत्साहन भत्ता वाटप केला आहे.

४) सांख्यिकीय माहिती:

राज्यातील सर्व बाजार समित्यांची प्रशासकीय व सांख्यिकीय माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेस चा उपयोग करुन बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च, मार्केट फी तसेच बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व किंमत याबाबत माहिती आवश्यकते प्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येत आहे.

ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

बाजार समिती पदाधिकारी / अधिकारी / शेतकरी प्रशिक्षण -

कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना तसेच बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रातील शेतक-यांना कृषि पणन मंडळामार्फत, तळेगांव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ अखेर राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव मार्फत बाजार समिती अधिकारी / कर्मचारी यांना बाजार समित्यांचे कामकाज व नविन कायदे, संगणक विषयक प्रशिक्षण, बाजार समित्यांचा अर्थसंकल्प व लेखे विषयक टॅली संगणक प्रणाली इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते तर शेतक-यांसाठी हरितगृह व्यवस्थापन, नर्सरी व्यवस्थापन, शेड नेट, टिश्यू कल्चर, लॅन्ड स्केप, मार्केटिंग इ. विषयाअंतर्गत अहवाल काळात ऑनलाईन ०९ व ऑफलाईन ४८ असे एकूण ५७ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले आणि या प्रशिक्षणाअंतर्गत ऑनलाईनद्वारे ८७७ व ऑफलाईनद्वारे २४१८ असे एकूण ३२९५ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यात आले.

'कृषि पणन मित्र ' मासिक -

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्याला ' कृषि पणन मित्र' मासिक प्रसिध्द करण्यात येते. सदरचे मासिक प्रत्येक महिन्याला मासिकाचे वर्गणीदार, राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रालयातील अधिकारी वर्ग, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी बाजार समिती, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना वर्गणीदार करणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर मासिकामध्ये कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना, सुगी पूर्व व सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर विविध तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात.

अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकांची संख्या :-

अ.क्रं.	महिना	वितरीत अंक
१.	एप्रिल २०२१	१६२३८
२.	मे २०२१	१७६९७
३.	जून २०२१	१७९२८
४.	जुलै २०२१	१७७५२
५.	ऑगस्ट २०२१	१७५९८
६.	सप्टेंबर २०२१	१७६८६
७.	ऑक्टोबर २०२१	१७१५९
८.	नोव्हेंबर २०२१	१६१६०
९.	डिसेंबर २०२१	१५७३९
१०.	जानेवारी २०२२	१५१९३
११.	फेब्रुवारी २०२२	१५१६५
१२.	मार्च २०२२	१४८५७

अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे सुमारे ३ लाखापेक्षा जास्त वाचक आहेत.

कृषि पणन मंडळाची दिनदर्शिका २०२२ व दैनंदिनी २०२२ -

सन २०२२ मध्ये पणन मंडळाची दिनदर्शिका व दैनंदिनी छपाई करुन, मंडळाचे दिनदर्शिकेवर कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांची माहिती व दैनंदिनीमध्ये राज्यातील बाजार समित्या, कृषि विभाग, सहकार विभाग, मंत्रालयातील अधिकारी वर्ग इत्यादी बाबत माहिती छापण्यात येते. सदर दिनदर्शिका व दैनंदिनी यांच्या प्रती राज्यातील बाजार समित्या, सर्व सहकारी संस्था, मंत्रालयातील पदाधिकारी व अधिकारी, पणन मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वितरीत करण्यात आल्या. सदर दिनदर्शिका व दैनंदिनीमार्फत कृषि पणन मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी चांगला उपयोग होत आहे.

प्रदर्शन / कार्यशाळा / चर्चासत्र / परीषद सहभाग व आर्थिक मदत -

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांना करुन देण्याच्या दृष्टिकोनातून, राज्यातील विविध भागातील प्रदर्शनामध्ये सहभाग घेण्यात येतो. तसेच सदर प्रदर्शनामध्ये सक्षम अधिका-यांचे मंजुरीने सहभाग घेवून, मंडळाचे विविध योजना / उपक्रम याचा प्रचार व प्रसिध्दी करून, त्यामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यातील विविध ०३ प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतलेला आहे.

तसेच आर्थिक वर्षामध्ये कृषि विषयक चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन आयोजित करण्यासाठी वेळोवेळी कृषि विद्यापिठे, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या , कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था यांच्याकडून पणन मंडळाकडे अर्थसहाय्य मिळणेबाबत विनंती केली जाते. पणन व्यवस्थेसंदर्भात प्रशिक्षण, प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करणे हे पणन मंडळाचे कार्य आहे. अशा प्रकारचे कामकाज इतर संस्था करीत असल्यास त्यांच्या चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन इत्यादींच्या आयोजनाकरीता कृषि पणन मंडळाकडून आर्थिक सहाय्य व कृषि पणन विषयक कामकाजांना गती देण्यासाठी आवश्यक आहे. सन २०२१-२०२२ मध्ये विविध कृषि पणनाशी संबंधित ०१ संस्थेला आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

कृषि पणन मंडळ जाहिरात -

विविध वृत्तपत्रे , मासिकांचे विशेषांक, शेतकरी संघटना, पणन व सहकार संबंधित विविध संस्था यांना पणन मंडळाच्या विविध योजना, कार्य व उपक्रम यांची माहिती शेतकरी आणि समाजातील विविध घटकांना होणेकरिता कृषि पणन मंडळाची जाहिरात देण्यात येते. कृषि पणन मंडळाच्या विविध योजना व इतर उपक्रमांची प्रसिध्दी सदर माध्यमे करित असतात. चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यातील १७ विविध वृत्तपत्रे, मासिकांचे विशेषांक यांना पणन मंडळाच्या विविध योजना, कार्य व उपक्रम यांची जाहिरात देण्यात आली. अशा प्रकारच्या जाहिरातीमुळे कृषि पणन मंडळाच्या योजना, कार्ये व उपक्रम यांची माहिती राज्यातील शेतकरी व संबधीत घटकांपर्यंत पोहचण्यास मदत होते.

प्रसिद्धी -

कृषि पणन मंडळातर्फे आंबा महोत्सव , इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग -

कृषि पणन मंडळ, दूरदर्शन, मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र, पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये दूरदर्शन, मुंबई व दूरदर्शन केंद्र, पुणे वरुन "कृषि दर्शन" या कार्यक्रमाअंतर्गत पणन मंडळाच्या अधिका-यांचे ०४ कार्यक्रम प्रसारित करण्यात आले.

प) देशांतर्गत व्यापार विकास विभाग

• उदिष्टे

कृषी विपणन ही अतिशय महत्वाची क्रिया आहे. देशांतर्गत व्यापार विकास विभागाचा मुख्य उद्देश शासकीय योजना आणि कृषि पणन मंडळाने विकसित केलेल्या विविध उपक्रमांच्या मदतीने शेती व्यापार विकसित करणे हा आहे. शेतकरी आणि ग्राहकांसाठी थेट विक्री व्यवस्था तयार करणे, खरेदीदार-विक्रेता संमेलनाचे आयोजन करणे, शेतकऱ्यांसाठी शेतमाल विक्रीकरीता नवनवीन योजना तयार करणे, नवीन आणि संभाव्य बाजारपेठांची माहिती घेणे व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे ही देशांतर्गत व्यापार विकास विभागाची प्रमुख कार्ये आहेत.

• उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपक्रम

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम आंबा महोत्सवाद्वारे सन २००३ पासून राबविण्यात येत आहे. हा उपक्रम पुढे सुरु रहावा या उद्देशाने कृषि पणन मंडळाने फळ व धान्य महोत्सव या योजनेची सुरुवात केली.

१) फळ व धान्य महोत्सव अनुदान योजना

आंबा, संत्रा, मोसंबी, द्राक्ष या सारखी हंगामी फळे तसेच धान्य यांचे थेट उत्पादक ते थेट ग्राहक विक्रीसाठी महोत्सवांचे आयोजन करण्याकरिता ही योजना राबविण्यात येते.

• **लाभार्थी:-**

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषि मालाच्या विपणनासंबधित स्थापित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग, उत्पादकांच्या सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व अधिनियम **१८६०** अंतर्गत नोंदणीकृत संस्था

• **नियम व अटी:-**

१. महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.
२. महोत्सवास प्रति स्टॉल रू.२००० /- प्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.
३. महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.
४. महोत्सवासाठी जास्तीत जास्त रू १.०० लाख अनुदान देय राहील.
५. फळ व धान्य महोत्सव आयोजनासाठी लाभार्थीस एका आर्थिक वर्षात एकदाच अनुदान देय राहील.
६. महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा.बॅनर्स, जाहीरात, बातम्या, बॅकड्रॉप, हॅन्ड बील इ. मध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे आयोजकांवर बंधनकारक राहील.
७. कृषि पणन मंडळास महोत्सवामध्ये स्टॉल घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करून देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.

८. महोत्सवाचा अहवाल व काही निवडक फोटो कृषि पणन मंडळाच्या 'कृषि पणन मित्र' मासिकामध्ये प्रकाशित करण्यासाठी पणन मंडळाकडे सादर करावेत.

९. महोत्सवातील प्रत, दर व इतर अनुषंगिक व कायदेशिर बाबींसाठी कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही. तथापी चांगल्या गुणवत्तेचाच माल विकणे स्टॉलधारकांवर बंधनकारक राहील. याची खातरजमा करणे आयोजकांवर राहील.

१०. महोत्सव आयोजनासाठीचा परिपुर्ण प्रस्ताव कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह सादर करणे आवश्यक आहे.

११. महोत्सव हा फक्त उत्पादकांकरिता असल्याने त्यामध्ये व्यापाऱ्यांना सहभागी होता येणार नाही किंवा मार्केटमधून आणुन मालाची विक्री करता येणार नाही. असे आढळून आल्यास अनुदानासाठी अपात्र ठरविले जाईल.

१२. महोत्सवाकरिता इतर कोणत्याही शासकिया योजनेअंतर्गत अनुदान घेतल्यास या योजनेअंतर्गत अनुदान देय होणार नाही.

१३. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रू १०० /- च्या स्टँपपेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

१४. राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांना एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त पाच वेळा महोत्सावाचे आयोजन करण्यास तसेच सर्व महोत्सवांचे मिळुन ५० स्टॉलसाठी (प्रति महोत्सव कमीत कमी १० स्टॉल) प्रति स्टॉल रू. २००० प्रमाणे कमाल अनुदान रू १.०० लाख असेल.

१५. महोत्सव आयोजन करणेसाठी अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र (Fire NOC) घेणे बंधनकारक राहील.

'फळ व धान्य महोत्सव अनुदान योजना' अंतर्गत

- गोवा राज्यात फोंडा येथे दि. २० मार्च ते २४ मार्च २०२१ या कालावधील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी द्राक्ष महोत्सावाचे आयोजन करण्यात आले. सदर महोत्सावामध्ये एकुण १७.५ मे.टन द्राक्ष व ५०५ किलो बेदाणा विक्री करुन उत्पादकांना अनुक्रमे रक्कम रु. १५.५० लाख व रु. २.०० लाख द्राक्ष उत्पादकांना प्राप्त झाले अशी एकुण रक्कम रु. १७.५० लाख रक्कमेची उलाढाल झाली.
- कोल्हापुर येथे दि.२६ मार्च ते ३० मार्च २०२१ या कालावधीत द्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. सदर महोत्सवात सांगली जिल्ह्यातील मिरज, तासगांव, पलुस व जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. कोल्हापुर द्राक्ष महोत्सवात एकुण ३० मे.टन द्राक्षाची विक्री करण्यात आली. द्राक्ष उत्पादकांना सरासरी प्रति किलो रु. ६०/- दर मिळाला. शेतकऱ्यांना विक्रीतुन रक्कम रु. १८.०० लाख प्राप्त झाले.तसेच १ मे.टन बेदाण्याची विक्रीतून उत्पादकांना सरासरी रु. २६०/- प्रति किलो दर प्राप्त झालेला आहे. बेदाणा विक्रीपोटी अंदाजे रु. २.७३ लाख प्राप्त झाले. कोल्हापुर द्राक्ष महोत्सवात एकुण रक्कम रु.२०.७३ लाखांची उलाढाल झाली.

२) कोरोना विषाणु प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर देशांतर्गत व्यापार विकास विभागामार्फत शेतमाल विक्रीबाबत करण्यात आलेल्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे ;

अ) शेतकरी ते ग्राहक भाजीपाला व फळे विक्रीबाबत करण्यात आलेल्या कामकाजाचा तपशील-

- कोरोना संकटाचे संधीमध्ये रूपांतर करत शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी चे विविध पर्याय पणन मंडळाने उपलब्ध करून दिले. त्याद्वारे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी आपला शेतमाल थेट ग्राहकांना विक्री केलेला आहे.
- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांची गृह सोसायटी, वैयक्तिक खरेदीदार, शेतकरी उत्पादक कंपनी, एन.जी.ओ. यांचेशी सांगड घालण्यात येऊन लॉकडाऊन कालावधीत सुमारे ७०० मे.टन फळे व भाजीपाल्याची विक्री करण्यात आली.

ब) आंबा हंगाम २०२१ -

- कृषि पणन मंडळाकडुन दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. तथापि, कोरोना प्रादुर्भावामुळे महोत्सवाचे आयोजन करणे शक्य झाले नाही.
- ग्राहकांकडुन आंबा उपलब्धतेबाबत सातत्याने विचारणा करण्यात येत होती. आंब्याच्या थेट खरेदी-विक्रीसाठी पणन मंडळाच्या संकेस्थळावरील **bs.msamb.com** हे खरेदी-विक्रीकरीताचे ऑनलाईन पोर्टल कार्यरत करण्यात आले. याद्वारे आंबा उत्पादकांकडुन नोंदणी करण्यात आली तसेच आंबा उत्पादकांची यादी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण संस्था, विविध कार्यालये, एन.जी.ओ., वैयक्तिक खरेदीदार यांना उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाद्वारे पुणे, मुंबई, ठाणे, अकोला, अमरावती, कोल्हापूर, नाशिक, सोलापुर, बारामती येथील वैयक्तिक खरेदीदार, रिटेलर्स, शेतकरी उत्पादक कंपनी, निर्यातदार, गृहनिर्माण संस्था यांना १,१५,००० डझन हापूस व २७,००० असे एकुण १,४२,००० डझन आंब्याची थेट विक्री करण्यात आली. याद्वारे अनुक्रमे रू.६५९.८० लाख व रू.१०८.४० लाख अशी एकुण रू.७६८.२० लाख विक्री झाली.

क) शेतमाल विक्रीबाबत परराज्यातील कामकाज -

आंतरराज्यीय वाहतूकीदरम्यान शेतमाल वाहन अडविलेबाबत तक्रारी प्राप्त होत होत्या. या तक्रारींचे स्वरूप लक्षात घेऊन त्या-त्या राज्यातील पणन मंडळाची कार्यालये, पोलीस यंत्रणा, महसूल यंत्रणाशी संपर्क करून समन्वयाने वाहतूक सुरळीत करण्यात आली. शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी यांना कोलकाता येथील कांदा व्यापा-यांचे माहिती उपलब्ध करून देण्यात येऊन कांदा विक्री होण्यास सहकार्य करण्यात आले.

लातूर येथील आर.जे.एस.शेतकरी उत्पादक कंपनी यांचेमार्फत पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रावरून १४० मे.टन लिंबू सिलिगुडी,गुवाहाटी व नेपाळ येथे पाठविणेबाबत कार्यवाही करण्यात आली.

३) आंतरराज्य शेतमाल व्यापार: रस्ते वाहतूक अनुदान योजना

महाराष्ट्र राज्य फळे व भाजीपाला उत्पादनात देशात आघाडीवर आहे. कांदे, टोमॅटो, डाळींब, द्राक्षे, केळी व आंबा हे प्रमुख फळे आणि भाज्या आहेत. फळे आणि भाजीपाला नाशवंत आहे आणि अयोग्य हाताळणी आणि साठवण पद्धतीमुळे तसेच वाहतूक विलंबामुळे फळे व भाजीपाल्यांचे काढणीपश्चात सुमारे २० ते ३० टक्के नुकसान होते. मागणी आणी चांगला दर यामुळे निर्यातीप्रमाणे देशांतर्गत व्यापार सुध्दा तेवढाच महत्वाचा आहे. मूलतः शेतकरी त्यांच्या दैनंदिन नित्यक्रमांमध्ये बदल करण्याच्या मानसिकतेत नसतो यामुळे वाहतूक भाडे भरुन शेतमाल परराज्यात पाठविण्यासाठी तयार होत नाही. शेवटी ते त्यांचे उत्पादन जवळच उपलब्ध असलेल्या बाजारपेठेत विकतात.

तथापि, अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना इतर राज्यात पाठविण्याचे महत्त्व लक्षात आलेले आहे. म्हणून या परिस्थितीचा आणि व्यावहारिक बाबींचा अभ्यास करून आंतरराज्य व्यापारास प्रोत्साहन देण्यासाठी कृषि पणन मंडळाने रस्ते वाहतूक अनुदान योजना राबविण्याचा निर्णय घेतला.

या योजनेअंतर्गत दि.३१ मार्च २०२३ पर्यंत देशांतर्गत रस्ते वाहतूक भाड्यामध्ये अनुदान (Transport Subsidy) देण्यात येणार आहे.

सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-

१. सदर योजना केवळ महाराष्ट्रातून रस्ते वाहतूकीद्वारे परराज्यात शेतमाल वाहतूक करून प्रत्यक्ष विक्री करण्यात येणाऱ्या व्यवहारासाठी लागू राहील.

२. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था योजनेअंतर्गत अनुदान मिळणेस्तव पात्र असतील.

३. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या सभासदांनी स्वत: उत्पादित केलेला शेतमालच संबधीत राज्यामध्ये पाठविणे आवश्यक असेल.

४. योजनेंतर्गत कामकाज सुरू करणेपुर्वी अर्जदार संस्थेने पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

५. सदर योजना आंबा, केळी, डाळींब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला या नाशवंत पिकांसाठीच लागू राहील. तसेच यामध्ये नमूद नसलेला नाशवंत शेतमाल परराज्यात विक्री करावयाचा झाल्यास लाभार्थी संस्था/ कंपनीने तसा स्पष्ट उल्लेख करून पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

६. सदर योजनेमध्ये रस्तेमार्गे प्रत्यक्ष वाहतूक होणाऱ्या शेतमालावर अनुदान देय राहील. यामध्ये इतर कोणत्याही अनुषंगिक खर्चाचा अंतर्भाव असणार नाही तसेच शेतमाल प्रत्यक्ष विक्री झालेनंतरच अनुदान देय राहील.

७. या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष वाहतूक केलेल्या अंतरानुसार खालीलप्रमाणे अनुदान देय असेल.

अ.क्र.	अंतर	देयअनुदान
१	किमान ३५० ते ७५० कि. मी. पर्यंत	वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.२०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.
२	७५१ ते १००० कि.मी. पर्यंत	वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.३०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.
३	१००१ ते १५०० कि.मी. पर्यंत	वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.४०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.
४	१५०१ ते २००० कि.मी.पर्यंत	वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.
५	२००१ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतरासाठी	वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.६०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.
६	सिक्कीम, आसाम, अरूणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम, मेघालय व त्रिपुरा या राज्यासाठी	वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.७५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.

८. महाराष्ट्रातील सीमेलगतच्या जिल्ह्यातील शेतमाल नियमीतपणे लगतच्या परराज्यात जात असल्याने अपरंपरागत व दूरवरील बाजारपेठांमध्ये शेतमाल पाठविणे अर्थक्षम होण्याच्या दृष्टीने ३५० कि.मी.पेक्षा कमी अंतरावरील वाहतूकीस कोणतेही अनुदान देय असणार नाही.

९. या योजनेअंतर्गत एका लाभार्थी शेतमाल उत्पादक सहकारी संस्था/उत्पादक कंपनीस एका आर्थिक वर्षात कमाल रू.३.०० लाख एवढे वाहतूक अनुदान देय असेल. सदर अनुदान केवळ महाराष्ट्रातून इतर राज्यात केलेल्या एकेरी वाहतूकीस लागू असेल.

१०. या योजनेअंतर्गत बिगर कृषिमालाची वाहतूक केल्याचे आढळल्यास त्यासाठी अनुदान देय असणार नाही.

११. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेने वाहतूकदारास देय असलेली वाहतूक भाड्याची रक्कम धनादेश/आरटीजीएस/ऑनलाईन बँकींगद्वारे अदा करणे बंधनकारक राहील.

१२. शेतकरी उत्पादक कंपनी/ सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाच्या प्राप्त विक्री रक्कमेतून अनुषंगीक खर्च जसे, शेतमालाची हाताळणी, विरळणी, वर्गीकरण, पॅकींग, हमाली, वाहतुक, व कंपनी/संस्थाचे सर्व्हिस चार्जेस इत्यादी खर्च, कपात करुन उर्वरीत रक्कम संबंधित उत्पादक सभासदांच्या खात्यावर वर्ग केल्यानंतर वाहतूक अनुदानासाठी अर्ज करू शकतील. कपात रक्कम व अनुषंगिक आर्थिक व्यवहार ही संबधित कंपनी/संस्था व उत्पादक सभासद शेतकरी यांची अंतर्गत बाब राहील. याबाबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा कोणताही संबध असणार नाही.

१३. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाला गुणवत्ते अभावी अथवा अन्य कारणामुळे विक्री रक्कम प्राप्त न झाल्यास त्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ जबाबदार असणार नाही तसेच सदर प्रकरणी वाहतूक अनुदान देय असणार नाही.

१४.अनुदान संपुर्णपणे नामंजूर, अंशत: मंजूर अथवा पुर्णपणे मंजूर करण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारावर बंधनकारक असेल. तसेच, योजनेच्या अटी/ शर्तीमध्ये उचित बदल करण्याचे अधिकार पणन मंडळास राहतील.

१५.संबंधीत शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांनी या योजनेअंतर्गत परराज्यात पाठविण्यात आलेल्या वाहतूक खर्चाचे अनुदान मागणी प्रस्ताव शेतमाल विक्रीनंतर ३० दिवसांत आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत.

१६.परराज्यात शेतमाल पाठवित असताना १ कन्साईनमेंट मध्ये शेतकरी उत्पादक कंपनी / संस्थेच्या किमान ३ उत्पादक शेतकरी सभासदांचा शेतमाल एकत्रितपणे पाठविणे आवश्यक राहील.

फ) तळेगाव शेती विभाग

कृषि पणन मंडळाच्या शेती विभाग,तळेगाव अंतर्गत १५० एकर जमिन क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र मुख्यफार्म व गिलबिल पट्टी असे दोन वेगवेगळया ठिकाणी असून मुख्यफार्म हे प्रक्षेत्र तळेगाव गाव भागास लागून असून गिलबिल पट्टी हे प्रक्षेत्र मुंबई – पुणे महामार्गास लागून आहे.

गिलबिल पटटी प्रक्षेत्र तपशील :

अ.क्र	गिलबिल पटटी तपशिल	क्षेत्र (एकर)
अ)	राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था	२८.००
ब)	निर्यात सुविधा केंद्र	०१.००
क)	फळबाग लागवडी खालील क्षेत्र (आंबा, पेरु, नारळ व आवळा)	१२.००
ड)	नाला,रस्ते, इमारत व पडीक क्षेत्र	०९.००
	एकुण क्षेत्र	**५०.००**

फळबाग -

- सदर प्रक्षेत्रावरील फळबागचे व्यवस्थापन जानेवारी २०१९ पासून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था पाहत आहे.

मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील :

अ.क्र	मुख्यफार्म तपशिल	क्षेत्र (एकर)
अ)	लागवडी योग्य क्षेत्र / कनव्हेशन सेंटर उभारणी	३०.००
ब)	तलावाखालील क्षेत्र (पाण्याचे क्षेत्र – अंदाजे २७ - २८ एकर)	४१.००
क)	मत्स्यतळी	०१.००
ड)	नाला, रस्ते, इमारत, पडीक क्षेत्र, मत्स्यतळी व न्यायालयीन बाब	२८.००
	एकुण क्षेत्र	**१००.००**

- मुख्यफार्म येथील संपुर्ण जमीनीस संरक्षण भिंतीचे बांधकाम चालू आहे.जमीनीची पुर्व,उत्तर-दक्षिण बाजूचे काम पुर्ण झालेले असून पश्चिम बाजूच्या (तलावभाग) भिंतीचे काम चालू आहे.
- मुख्यफार्म येथील जमीनीवर कन्वहेशन सेंटर उभारणी बांधकाम चालू करण्यात आलेले आहे.
- मुख्यफार्मवरील तलाव (४१ एकर) मच्छिमारीसाठी मावळ तालुका मच्छिमार को-ऑप सोसायटी, तळेगाव दाभाडे यांना तीन वर्ष करारावर देण्यात आलेला आहे.
- स.नं. ३४१/१ हद्द कायम करुन घेणेबाबत भूमी अभिलेख कार्यालयाकडे पाठपुरावा चालू आहे.या गटाव्यतिरिक्त संपुर्ण जमीनीची शासकीय मोजणी करुन घेण्यात आलेली आहे.
- स.नं २०१ व २०२ जमीन मालमत्ता सातबारा उता-यावर कृषि पणन मंडळाच्या नावाच्या नोंदीचे काम पुर्ण झाले आहे.सदर जागेस कंपाऊंड वॉल करणेबाबत पुढिल कामकाज चालु आहे.
- सदर जमीनी संबंधीत वि.सह.नि.सह.संस्था सहकार विभाग,पुणे , वडगाव मावळ न्यायालयातील व मुंबई उच्च न्यायालयातील दावे संदर्भातील कामकाज मुख्यालय ,पुणे यांचेशी समन्वय ठेवून चालू आहे.

*****